# <u>दादा</u>

दादा म्हणताच आपल्या डोळ्यासमोर येते एक ऋषितुल्य उत्तुंग, अजातशत्रु असे आदर्श व्यक्तिमत्व! हे व्यक्तिमत्व घडले त्यांच्यातील अष्टपैलू गुणांमुळे!

त्यांचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांनी ओळखलेले शिक्षणाचे महत्व. १९१५-२० साठी लिहिणे, वाचणे हिशोबापूरते गणित म्हणजे झाले शिक्षण. परंतु मॅट्रिकची परीक्षा होताच भास्कर काका किंवा बापुकाका यांच्या प्रमाणे परंपरागत व्यवसायात न रमता पळून जाऊन शिक्षण घेतले. तत्वज्ञानात M.A. करून वकील झाले, पुण्यामध्ये प्रोफेसर म्हणून वर्षभर कार्यही केले. स्वतःचे शिक्षण झाल्यावर मुलांप्रमाणेच मुलींनाहि शिकवले. मोठ्या मुलीला मॉटेसरी शिक्षणासाठी मुंबईला पाठवले तर तिसऱ्या व चौथ्या मुलीला होमसायन्सच्या पदवी शिक्षणासाठी त्याकाळी बडोद्याला पाठविले. दोन वर्षातच त्यांची लग्न झाल्यामुळे पाचव्या मुलीला त्यांनी कोल्हापूरला पाठवले दुसऱ्या व सहाव्या मुलींनाहि B.A. चे शिक्षण पूर्ण करायला प्रोत्साहित केले. या बरोबरच गावातील ही मुलामुलींच्या शिक्षणासाठी New English School ची स्थापना करण्यास सक्रिय सहभाग घेतला.

“नही ज्ञानेन सदृशं पवित्रम विद्यते!” ही गोष्ट त्यांच्या मनावर पूर्ण बिंबली होती म्हणून त्यांनी पुढील पिढीसाठी घरातच एक ग्रंथालय निर्माण केले. कामापरत्वे परगावी गेल्यानंतर येताना गोष्टींची नावाजलेली पुस्तके ते आवर्जून आणत तसेच दर महिन्याला कल्याण, विवेक, अमृत अशी दर्जेदार मासिके मागवत. श्रेष्ठ धार्मिक ग्रंथाचे वाचन करून त्यातील कथाभाग सर्व कुटुंबाला रसाळ वाणीने सांगत. संध्याकाळी कधी भत्ता खाताना तर कधी मक्याची कणसे वा शेंगा खाताना त्यांच्या तोंडून हा कथाभाग ऐकणे एक अमृततुल्य अनुभव असे.

ज्ञानामृत ग्रहण करण्याबरोबरच सत्संगाची त्यांना फार आवड होती. मालेगांवात येणाऱ्या प्रत्येक सत्पुरुषाला ते घरी बोलावल्याशिवाय राहत नसत. मग प्रजापिता ब्रह्मकुमारीची साध्वी असो वा गायत्री परिवारीतील व्यक्ति असो. मारवाडी गुरु असो की विलिनात्मा सारखी व्यक्ति यामुळेच आपल्याला अशोक बाबा सारखे सत्पुरुष जीवनभर लाभले. मालेगांवांतील ज्ञानोपासक मंडळातर्फे महाराष्ट्रातील थोर विचारवंतानाही ते आमंत्रित करीत म्हणूनच गोळवलकर गुरुजी, आचार्य अत्रे, ब. मो. पुरंदरे, इत्यादि पुरूषांचे पाय आमच्या घराला लागले.

सत्संगामुळे आध्यात्मिक साधना सुरू झाली व त्याच वेळी योगासनाचेही महत्व त्यांना पटले होते. ते स्वतः सर्व कठीण योगासानेही (लीलया करीत) त्यामुळेच १२-१२ तास बसून काम करण्याचा स्टॅमिना त्यांच्यात आला. आमच्या लहानपणी आम्ही त्यांना सदैव कामतच गढलेले पाहिले.

एवढ्या व्यस्त जीवनातही वेळ मिळालाच तर ते आम्हाला फिरायला, सिनेमाला नेत किंवा बागेत सहलसुद्धा आयोजित करत. पर्यटनाची आवड होती म्हणून त्यांनी त्याकाळात कठीण अशा चार धाम यात्राही वहिनीला

घेऊन केल्यात. त्यांच्या आध्यात्मिक आचारणामुळे त्यांच्या चेहऱ्यावर सतत एक सात्विक समाधान व प्रसन्नता दिसे. आमच्या जीवनात आम्ही त्यांना कधीच चिडलेले पाहिले नाही.

त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे त्यांनी अल्पावधीतच निष्णात वकील म्हणून नाव कमावले. त्यांच्या बुद्धिमत्तेचा सर्व प्रतिस्पर्धी वकील, न्यायाधीशही अंदर करीत. एकदा एक गमंतच झाली. दादा परगावहून  तडक कोर्टातच गेले व त्यांनी केसच्या युक्तिवादाला सुरुवात केली ५-१० मिनिटांत त्यांचे कारकून असलेल्या मदानेच्या लक्षात ही गोष्ट आली की दादा विरुद्ध बाजूने बोलात आहेत व त्यांनी दादांना जवळ जाऊन सांगितले परंतु मुळीच न डगमगता त्यांनी स्पष्ट केले की असे विरोधी पक्षाचे वकील म्हणू शकतात परंतु ते कसे चुकीचे आहे हे  मी आता स्पष्ट करतो, त्यांची समय सूचकता हजरजबाबीपणा  पाहून वकिल, न्यायाधीश व जमलेले दोन्ही पक्षाचे पक्षकार थक्कच झाले.

त्यांचा सर्वात मोठा गुण म्हणजे गुणग्राहकता! त्यांनी आम्हा सर्व भावंडांना बोलण्याची, दुसऱ्याची निरीक्षण करण्याची, आत्मपरीक्षण करण्याची सवय लागावी म्हणून प्रत्येकाचा वाढदिवस साजरा करण्याचा पायंडा पाडला होता. सर्वात शेवटी उत्सव मूर्ती विषयी ते बोलत. तेंव्हा त्या उत्सव मूर्तीलाही माहीत नसलेल्या गुणांची प्रकर्षाने जाणीव करून देत व त्याला योग्य असा उपदेशही करत. महाभारतातील युधीष्टीरा प्रमाणे त्यांना सर्व व्यक्तीचे फक्त गुणच दिसत अन ते त्या गुणांचे भरभरून कौतुक करून त्याला प्रोत्साहन देत त्यामुळे थोडेही यश मिळाले की ते दादांना केंव्हा सांगू अन केंव्हा नाही असे आम्हा भावंडांनाच नाही तर त्यांच्या जावयांना, सुनांना, नातवंडांना इतकेच नव्हे तर गावातील लोकांनाही  होई. हेच त्यांचे अजातशत्रुत्व होय.

कुटुंबाला सुशिक्षित, सुसंस्कृत करण्या बरोबरच गावाच्या, समाजाच्या, संघाच्या कार्यातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला व अविरत श्रम घेत राहीले.

थोडक्यात दुर्लभ अशा मानवी जीवनात निष्काम कर्मयोग करून त्यांनी जीवन सार्थक केले. त्यांच्या या कार्यात त्यांना यशस्वी साथ दिली ती आमच्या पतिव्रता आईने अर्थात वाहिनीने! तिने घर सांभाळले, दीर, नणंदा, त्यांची मुले, संघाचा प्रचारक, आले गेले पाहुणे, गावातली  संपर्कातली लोक सर्वांची बडदास्त ठेवली.

आपल्या जीवनात तिने मुली नातींची २३-२५ बाळांतपणे हसतमुखाने केली. १६ सोमवारा सारखे व्रत, उपास तापास, करून आध्यात्मिक साधनही केली, प्रपंचात राहून परमार्थही संधी केला.

दादा वाहिनी सारखे आई-वडील लाभे हे आमचे परम भाग्य! जन्मो जन्मी हेच माता पिता लाभावेत हीच श्री सप्तशृंगी मातेच्या चरणी कळकळीची प्रार्थना!

**सौ. हिरा अहेर, नागपूर**